India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

## पूज्य गुरुदेवांचा प्रवास



## गुरुदेवांची मलेशिया भेट – दि. २२ ते २७ जून, २०११

दि. २२ जूनला दुपारी गुरुदेवांचे सिंगापूरहून मलेशियाला आगमन झाले. विमानतळावरून ते सरळ क्लांग येथील नविन आश्रमाच्या उद्घाटनासाठी रवाना झाले. तेथे पोहोचल्यावर पू. गुरुदेव अतिशय आनंदी दिसत होते. त्यांनी उपस्थित २०० अभ्यासींना अभिवादन केले व लगेचच सत्संगाचे संचालन केले. त्यांनी ती रात्र आश्रमातच व्यतीत केली व दुसऱ्या दिवशी सकाळी ते आश्रमापासून १० मिनीटांच्या अंतरावर असणाऱ्या प्रीमीयर हॉटेल येथे होणाऱ्या चर्चासत्रामध्ये सामील झाले. हॉटेलमध्ये त्यांच्या वयानुरुप होणाऱ्या सर्व गैरसोयी सोसून त्यांनी चर्चासत्रादरम्यान संपूर्ण वेळ त्याठिकाणीच राहणे पसंत केले.

दि. २३ रोजी सायंकालीन सत्संग ५ वा. होणार होता परंतू पू. गुरुदेव ४.१५ वाजताच सभागृहात सर्व अभ्यासींना भेटण्यासाठी व चर्चासत्राच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी उपस्थित झाले. पू. गुरुदेवांनी दररोज सकाळ व संध्याकाळच्या सत्संगांचे संचालन करुन सर्व सहभागींना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. तसेच लिफ्टपासून सभागृहात जाण्याच्या मार्गावर त्यांनी सर्व मुलांना अभिवादन केले. चर्चासत्राचा कार्यक्रम भाषणे, बैठका व सांस्कृतिक कार्यक्रमांनी परिपूर्ण असा होता. चर्चासत्राची मध्यवर्ती कल्पना 'एक हृदय – एक मानवजात' होती व बंधू कृष्णा, संतोष खानजी, कमलेश पटेल, कम्बीज व सतबीर यांनी ही संकल्पना पाच वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विशद केली ज्यामुळे ही सत्रे परिपूर्ण व विचार करावयास प्रवृत्त करणारी ठरली. यावेळी पू. गुरुदेव स्वत: सभागृहात उपस्थित होते.

रविवार, दि. २६ जून रोजी गुरुदेवांनी मलेशियन आश्रमामध्ये शेवटच्या सत्संगाचे संचालन केले व त्यादिवशी सर्व मलेशियन अभ्यासींना वैयक्तिक सिटींग देण्यात आली. दुसऱ्या दिवशी दि. २७ जून रोजी पू. गुरुदेवांनी चेन्नईसाठी प्रयाण केले.

या प्रवासादरम्यान पू. गुरुदेवांच्या अनौपचारिक संभाषणातील काही अंश :

- पू. गुरुदेव म्हणाले की ते कायम आनंदी असतात कारण त्यांच्या मनात काहीही शंका किंवा इच्छा नाहीत–या दोन गोष्टी लोकांना दु:खी बनवितात.
- जेव्हा एका अभ्यासीने पू. गुरुदेवांना इतर अभ्यासींना भेटण्यासाठी त्यांच्या उपलब्धतेबाबत विचारले तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले "मी सगळ्या गोष्टींसाठी केव्हाही तयार आहे !"
- बाबूजी महाराज म्हणत असत की, मानवाला प्रेम म्हणजे काय याची कल्पना नाही. प्रेम हे निर्माता व निर्मिती यामध्ये असते. केवळ निर्मितीमध्ये आपसात नाही. निर्मित मानवांमध्ये केवळ स्नेह व परस्परांवर अवलंबणे असू शकते ज्याला आपण चुकीने प्रेम समजत असतो.
- कोणीही वेदना सहन केल्याशिवाय प्रेम करु शकत नाही. प्रेम म्हणजेच वेदना. जर वेदना नसतील तर प्रेम असणेही संभव नाही.
- 'परमानंद' ही अशी गोष्ट आहे जी या जगाशी संबंधित नसून ती एक अवस्था आहे. 'आनंद' ही अवस्था नाही तर एक अनुभूति आहे.'सुख' ही सुद्धा एक अनुभूति आहे. एक व्यक्ति व तिचा निर्माता यांमधील संबंधातील प्रेम असे असते जसे आई व तिचे मूल यांमधील प्रेम.







## चेन्नई येथे २७ जून ते २० जुलै

चेन्नई विमानतळावर गुरुदेवांच्या स्वागताकरिता खूप मोठ्या संख्येने अभ्यासी उपस्थित होते. तेथून गुरुदेव सरळ मणपाक्कम आश्रम येथे रवाना झाले. ते जेव्हा तेथे पोहोचले, तेव्हा ते उद्गारले, "मला वाटत आहे की जणू काही मी उर्जास्त्रोताला जोडलो गेलो आहे आणि आता माझ्यामध्ये उर्जेचे संक्रमण होत आहे."

१ जुलै रोजी काही विवाह संपन्न होणार होते. त्याच्या काही दिवस आधी गुरुदेवांनी विचारले, "आज काही विवाह संपन्न होणार आहेत का?" तेव्हा त्यांना सांगितले गेले की आज नाहीत, परंतु शुक्रवारी आहेत. तेव्हा ते म्हणाले, "बरेच दिवस झाले, ध्यान कक्षामध्ये मी सत्संग घेतला नाही, होय ना?" आणि त्यांनी सत्संगाचे संचालन करण्याची इच्छा व्यक्त केली. हा एक अचानकपणे घेततेला निर्णय होता. दोन नवीन प्रशिक्षक बनविणे, त्यांचे इ-मेल्स पाहणे व न्याहारी ही सर्व सकाळची कामे गुरुदेवांनी अतिशय लवकर संपवून ते सत्संगाकरिता तयार झाले. बरीच कामे करावयाची असल्याने, गुरुदेवांना शयनकक्ष ते कार्यालय अशा फेऱ्या मारत, अतिशय वेगाने काम करीत असलेले पाहून सर्वांना आश्चर्य वाटत होते.

एका सकाळी एक बंधू येऊन त्यांना म्हणाला की त्याला एका महत्वाच्या मीटिंगसाठी बाहेर जावे लागेल. तेव्हा ते म्हणाले की, "उशीरा जाण्यापेक्षा लवकर पोहोचणे यातच शहाणपण आहे."

भेटीसाठी आलेल्या एका युगुलाने गुरुदेवांना सांगितले की त्यांनी एक मूल दत्तक घेतले आहे. गुरुदेव ते ऐकून खूप खुश झाले व म्हणाले, "जे लोक मुलांना दत्तक घेतात त्या लोकांबद्दल मला खूप प्रेम वाटते. जगामध्ये कितीतरी बेघर मुले आहेत आणि मी नेहमीच या गोष्टीचा समर्थक आहे. परंतु, कोणत्याही परिस्थितीमध्ये तुम्ही त्या मुलाला वा मुलीला ते एक दत्तक मूल असल्याचे सांगता कामा नये. एवढेच नव्हे, तर एवढ्या लहान वयामध्ये सुद्धा तसे बोलू नये कारण मुलांच्या मनामध्ये या ना त्या प्रकारे ते बोल नोंदले जातात. त्या मुलाला स्वत:च्या मुलाप्रमाणेच वाढवा." त्यानंतर त्यांनी लगेचच झालेल्या सत्संगामध्ये त्या दांपत्याला बसणे शक्य व्हावे यासाठी मुलाची तात्पुरती काळजी घेण्याबाबत सूचना दिल्या.





## गुरुपौर्णिमा – शुक्रवार, १५ जुलै २०११

गुरुदेव प्रात:काळी लवकर तयार झाले व त्यांनी सर्वप्रथम आश्रमाच्या परिसरात नुकत्याच बांधून तयार झालेल्या ऑडिटोरियम व ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्घाटन केले. त्यानंतर ते ध्यानकक्षाकडे जाण्याकरिता निघाले. तेथे सकाळच्या सत्संगाचे संचालन करण्याकरिता गुरुदेव ७ वाजताच उपस्थित होते. ध्यानकक्ष ओतप्रोत भरला होता व शेजारच्या निवासस्थानांच्या गच्चीवरील जागेमध्येही अभ्यासी बसले होते.

सायंकाळी बंधू गणेश व बंधु कुमरेश यांनी ध्यानकक्षामध्ये व्हायोलिन वादन सादर केले. गुरुदेव सुरुवातीला आपल्या कक्षामध्येच टी.व्ही. वरती ते पाहत होते. परंतु जस-जसे वादन मंत्रमुग्ध व रोचक होत गेले तसे गुरुदेव ध्यानकक्षामध्ये आले. त्यामुळे कलाकारांना व अभ्यासींना अत्यानंद झाला. नेहमीच स्मरणात राहण्यासारखी ती रात्र होती: पौर्णिमेच्या रात्री ह्या कार्यक्रमाचा आनंद गुरुदेव आपल्या अभ्यासींसमवेत लुटत होते. अशा पवित्र दिवसाचे हे समापन खरोखरीच भव्य होते.







## तिरुपूर २६ जुलै ते २९ जुलै २०११

२५ जुलै रोजी जन्मदिवस सोहळ्याची सांगता झाली. गुरुदेवांनी तिरुपूर येथेच २९ जुलैपर्यंत वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. परत निघण्यापूर्वी अभ्यासी गुरुदेवांना भेटू इच्छीत होते. गुरुदेवही शक्य होईल तेवढ्या अभ्यासींना प्रत्यक्ष भेटले. वास्तविक ते खूप थकले होते आणि एवढ्या मोठ्या उत्सवानंतर त्यांना विश्रांतीची नितांत आवश्यकता होती. गुरुदेव म्हणाले, 'मी ज्यांना भेटलो आहे आणि ज्यांना भेटलो नाही अश्या सगळ्यांना, जे मला शक्य आहे ते सर्व काही देऊन टाकले आहे.'

अभ्यासींच्या एका चमूला संबोधित करताना गुरुदेव म्हणाले,'जेव्हा तुम्ही अश्या भंडाऱ्यासाठी येता, तेव्हा काही आणखी दिवस येथे राहा, निघण्याची घाई करू नका. कृपा करून शांतपणे, आपला जगण्याचा वेग कमी करून, तणाव–रहित होऊन, या वातावरणात शक्य तितका जास्त वेळ राहण्याचा प्रयत्न करा.' वातावरणाविषयी बोलताना एक अभ्यासी म्हणाले, की हे तंबू उतरताना पाहून, हे स्थळ रिक्त होताना पाहून खूप दु:ख होत आहे. गुरुदेव म्हणाले "मला हे असे २४ जुलैच्या संध्याकाळपासूनच वाटावयास लागले होते, कारण अभ्यासींची पहिली तुकडी त्यावेळेस जाण्यास निघाली होती."

एका अभ्यासीने उत्सवात काम करण्याची संधी दिल्याबद्दल गुरुदेवांचे आभार मानले असता गुरुदेव उत्तरले, "ज्याला खरोखर काम करण्याची इच्छा असते, त्याच्यापर्यंत काम आपसूकच मार्ग काढीत येऊन पोहोचते."

## चेन्नई २९ जुलै ते १५ ऑगस्ट २०११

गुरुदेवांचे २९ जुलै रोजी चेन्नई येथे आगमन झाले. चेन्नईत येताच ते सरळ मणपाक्कम आश्रमात गेले. ते तेथे पोहचताच त्यांचे दैनंदिन जीवन सुरु झाले.

'सहजमार्गाचा इतिहास' यावर भाष्य करण्याच्या एका नवीन प्रकल्पावर गुरुदेव सध्या काम करीत आहेत. तिरुपूर मध्ये असताना गुरुदेवांनी एक विधान केले होते, "जेव्हा एखादी व्यक्ती जिवंत असते तेव्हा आपण तिच्या तपशीलात शिरू इच्छित नाही आणि त्यामुळेच तो तपशील कायमचा नष्ट होतो." त्यांनी विविध देशांमधील सहजमार्गाच्या इतिहासाचे संग्रहण करण्याच्या काही अभ्यासींच्या पुढाकाराचे कौतुक केले. युरोपीय अभ्यासींनी युरोपातील सहजमार्गाच्या इतिहासावर गुरुदेवांची मुलाखत घेतली. २ ते ५ ऑगस्ट दरम्यान गुरुदेवांचे वास्तव्य 'गायत्री' या त्यांच्यानिवासस्थानी होते. ६ तारखेस सकाळी ते मणपाक्कमला परतले.

२ ऑगस्टला पूज्य गुरुदेवांनी सुमारे १५० परदेशी अभ्यासींना गायत्री येथे रात्रीच्या भोजनासाठी निमंत्रित केले होते. उत्तम यजमानाप्रमाणे गुरुदेवांचे कुटुंबिय भोजन व्यवस्थित घेतले की नाही यावर देखरेख करीत होते. दुसरीकडे गुरुदेवांच्या वयोमानाचा त्यांच्यावर झालेला परिणाम दिसून येत होता. त्यांना खुर्चीतून ऊठ–बस करताना खूप वेदना होत होत्या आणि त्यांचा हा त्रास पाहून सर्वांनाच वाईट वाटत होते. एकदा गुरुदेवांना खुर्चीतून उठताना खूप कष्ट पडत असताना काही अभ्यासींनी त्यांना मदत देऊ केली. त्यांनी ती नाकारली आणि प्रयत्नपूर्वक ते स्वत: उभे राहिले.

जेव्हा गुरुदेव दिनांक ६ ऑगस्ट रोजी मणपाक्कम येथे आले तेव्हा मुंबईहून आलेल्या अभ्यासींच्या एका चमूने मुंबई येथील जमीनीच्या प्रकल्पासंदर्भात त्यांना माहिती दिली. गुरुदेवही या प्रकल्पाचा तपशील जाणण्यास उत्सुक होते. जेव्हा एक बंधू म्हणाले की, आता कुठे प्रकल्प अर्धा झाला आहे पण अजून पूर्ण काम झालेले नाही त्यावर गुरुदेवांनी 'हत्तीची सोंड दिसत असेल तर मग शेपूटही दिसेल' या हिंदी म्हणीचा दाखला दिला.

रात्रीच्या जेवणानंतर एका रात्री एका भगिनीने गुरुदेवांकडे थोडा वेळ देण्याची विनंती केली असता ते म्हणाले, "तुम्ही पाहता आहात मी किती दमलो आहे. माझी काय परिस्थिती आहे हे पाहून मगच विनंती करा." हा सर्वांसाठीच धडा होता.

एखाद्या गोष्टीबद्दल आवड निर्माण करण्याविषयी बोलताना गुरुदेव म्हणाले,'कोणत्याही क्षेत्रात पहिले पाऊल म्हणजे रुची निर्माण करणे. सहजमार्गात देखील याविषयी बाबूजी महाराजांनी सांगितले आहे.' आपल्याला ज्याबद्दल आवड निर्माण करावयाची असेल त्या विषयाला आपला एक हिस्सा बनविले पाहिजे. म्हणजेच गुरूदेव, मिशन आणि पध्दती या तिघांना आपलेसे केले पाहिजे.

दि.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान मणपाक्कम येथे आयोजित केलेल्या विभागप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या बैठकीस गुरुदेव उपस्थित राहिले तसेच त्यांनी उद्घाटन व सांगता समयी उपस्थितांना संबोधित केले.

दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त बंधु ए.पी.दुरै यांच्या हस्ते मणपाक्कम आश्रमात ध्यानकक्षाच्या समोर ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी सुमारे १५० अभ्यासी व मुले उपस्थित होती.

दि. १६ ऑगस्ट रोजी मिशन करिता जमीन नोंदणीच्या कामानिमित्त गुरुदेव दिल्लीला रवाना झाले. तेथून पुढे १८ ऑगस्टला पुन्हा नवीन जमिनीच्या नोंदणी करिता गुरुदेव हैद्राबाद येथे रवाना झाले.





## दक्षिण विभागातील विभागप्रमुख आणि केंद्रप्रमुखांसाठी कार्यशाळा, चेन्नई १३ ते १५ ऑगस्ट २०११

१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूच्या केंद्रप्रमुख व विभागप्रमुखांसाठी चेन्नई येथे एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेची सुरुवात गुरुदेवांच्या सिटिंगने झाली. त्यानंतर गुरुदेवांनी भाषण दिले. प्रशिक्षक हे मिशनच्या रक्तवाहिन्या असून ते गुरुदेवांचे कार्य पुढे चालू ठेवतात असे गुरुदेव या प्रसंगी म्हणाले. पूज्य बाबूजींनी दक्षिणेत येऊन प्राणाहुतीचे संप्रेषण केले त्याचा परिणाम २० वर्षानंतर आपणांस दिसत आहे याकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, प्रशिक्षकांनी गंभीरपणे काम केले पाहिजे आणि समर्पित भावनेने सेवा केली पाहिजे. जेव्हा ते सेवा करीत असतात तेव्हा त्यांना नेहमीच गुरुदेवांसारखी प्रगतीची संधी मिळत असते.

यानंतर बंधू कृष्णा यांनी आपल्या भाषणात जागतिक सेवासंघाची (ग्लोबल सर्विस टीमची– जीएसटी) ओळख करून दिली. ते म्हणाले की, प्रशिक्षकांनी आध्यात्मिक कार्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कारण ते त्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. त्यांनी प्रशासकीय काम स्वयंसेवकांकडे सोपविले पाहिजे. जीएसटी च्या विविध सदस्यांनी आपापल्या मुख्य कार्याचे सादरीकरण केले. त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही झाला. आध्यात्मिक कार्यक्रम विकास, प्रशिक्षण पूर्तता, सामाजिक प्रगति, अभ्यासी सेवा, स्थायी संपत्ती, कार्यसेवा आणि सतत सुधारणा इत्यादि संघांनी सादरीकरण केले. आपापल्या केंद्रात हे सगळे कसे राबविता येईल याचा आराखडा तयार करण्यासाठी विभागप्रमुख व केंद्र प्रमुख उशिरापर्यंत कार्यरत होते.

शेवटच्या दिवशी बंधू राजगोपालन यांनी प्रशिक्षकांचे कार्य कसे असावे याचा पुनरुच्चार केला. सर्व विभाग आणि मुख्य केंद्रांना पुढील एका वर्षासाठी ते कशाप्रकारे काम करणार आहेत त्याची रूपरेखा सादर करण्यास सांगण्यात आले. कार्यशाळेची सांगता गुरुदेवांच्या भाषणाने झाली. त्यात ते म्हणाले की सर्वप्रथम आपण सर्वांनी स्वत:चे एका चांगल्या माणसात रूपांतर केले पाहिजे. ते पुढे म्हणाले की, तुम्ही सर्व जण जीएसटीसाठी आहात तर मी आय एस आय (इंडिविजुअल सर्विंग इंडिविजुअल) साठी (एकास एक सेवा ) देण्यासाठी आहे. माणुसकीने वागा. तुमच्या समोरील व्यक्तीशी प्रेमाने वागा आणि त्या व्यक्तीला संपूर्ण हृदयापासून सेवा द्या. तुम्ही स्वच्छ असाल तरच तुम्ही दुसऱ्याला उत्तम सेवा देऊ शकता. तुम्ही अभ्यासीची काळजी घेतलीत तर 'तो' तुमची काळजी घेईल.

## आफ्रिकेतील अभ्यासींसाठी शिबीर

१६ ते २२ जुलै दरम्यान प्रथम मणपाक्कम व नंतर तिरुपूर येथे प्रथमच आफ्रिकेतील विविध देशांमधील ६० अभ्यासींसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आफ्रिकी बंधू आणि भगिनींच्या गरजांना पूरक असा प्रशिक्षण, सिटिंग, सत्संग आणि कार्यशाळा असा भरघोस कार्यक्रमांनी भरलेला हा आठवडा होता. यातील बहुतांश अभ्यासींनी भारतात प्रथमच गुरुदेवांच्या भेटीला येण्यासाठी मागील अनेक महिन्यांपासून बचत केली होती. १६ जुलै रोजी गुरुदेवांनी अभ्यासींना संबोधित केले व सत्संगाचे संचलन केले. त्यांच्या आशयघन भाषणाने सर्वांना उत्तेजन मिळाले. गुरुदेवांचे भाषण आफ्रिकी लोकांना उद्देशून असले तरी सर्व मानवजातीवर परिणाम करणारे होते यात शंका नाही.

ते म्हणाले की, कुठलाही देश अंधारलेला (काळा) नसून लोकांची हृदये तशी झाली आहेत. जातीयवादी रूढी, खुळचट कल्पना, समजुती हे सर्व समूळ नष्ट झाले पाहिजे. त्यांनी तिथे उपस्थित असणाऱ्यांना आवाहन केले की, त्यांच्या देशातील लोकांच्या हृदयात ज्योत पेटविण्याचे काम निर्भयपणे करण्याचे हे आव्हान त्यांनी पेलले पाहिजे. जनतेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी एकच मार्ग आहे तो म्हणजे एक जग, एका मानवजातीची निर्मिती!

बंधू कृष्णा यांचे 'विविधतेमधील एकता' या विषयावर,बंधू राजगोपालन यांचे सहजमार्गाची अद्वितीयता दर्शविणारे तसेच बंधू ए. पी. दुरै यांचे भूमिका आणि जबाबदारी यावरील भाषणे कार्यास प्रवृत्त करणारी व उत्साह वाढवणारी ठरली.

सहभागी अभ्यासींपैकी अनेकजण मणपाक्कम ते तिरुप्पूर बसने आले होते. गुरूदेवांच्या सल्ल्यानुसार ते सर्वजण भोजनासाठी वाटेत नत्रामपल्ली व कृष्णगिरी येथील आश्रमात थांबले होते. या आश्रमांत या बंधुभगिनींना प्रेमाने खाऊ घालण्यात आले. हे दोन आश्रम पाहणे हा सर्वांसाठी एक शिकण्याचा अनुभव होता.



खंड ४ अंक ५ सप्टेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र



तिरुपूर येथे बंधू जेम्स व बंधू माइकल यांनी भाषणे केली. समारोपाच्या भाषणात गुरुदेव म्हणाले, "आपल्या भाषा भिन्न आहेत परंतु जेव्हा आपणामधे प्रेम असते तेव्हा भाषेची अडचण नसते. डोळे बोलतात. हो कि नाही? ... म्हणून मानव बनून रहा आणि ईश्वराने आपणास दिलेल्या मानवतेचा आनंद घ्या. मानवता म्हणजे प्रेम करणे, वाटून घेणे, एकमेकांची काळजी घेणे, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे केकचे तुकडे न करणे. माझ्या म्हणण्याचा अर्थ मानवतेचा केक. मानवतेचे विभाजन न करणे. आणि हे सर्व केवळ सिध्दांत किंवा कल्पना न राहता आपल्या आचरणात आले पाहिजे, हे लक्षात ठेवून की ईश्वर त्याच्या भाषेमधे आपल्याशी बोलत असतो. त्याची भाषा कोणती? तर नि:शब्दता. ह्रदयाकडून ह्रदयाकडे, मनाकडून मनाकडे नव्हे."

प्रत्येक अभ्यासीने ओतप्रोत भरलेल्या, परिपूर्ण ह्रदयाने शिबीराचा निरोप घेतला व गुरुदेवांचा संदेश ह्रदयात साठवून, जतन करून ठेवण्याचे वचन दिले. या संदेशाच्या विकासाने व प्रकाशित होण्याने प्रत्येक मानवाला त्याच्या तेजाचा स्पर्श होईल.

## गुरुदेवांच्या जन्मदिवसाचे समारंभ

### भारतातील विविध केंद्रांमध्ये

कोलकाता येथील कार्यक्रमास सुमारे २७५ अभ्यासी व मुले हजर होती. तेथे भजनांचा कार्यक्रम झाला. न्याहारीनंतर गुरुदेवांचे हिंदी भाषेतील शिस्त या विषयावरील भाष्य ऐकवले गेले, त्यानंतर गुरुदेवांच्या परदेशवारीच्या छायाचित्रांची चित्रफ़ीत दाखवण्यात आली. साधनेच्या विविध पैलूंबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नांची अगदी नवीन अभ्यासींनी देखील उत्साहाने उत्तरे दिली. गुरुदेवांच्या जीवनावरील "डाऊन मेमरी लेन" या पुस्तकावर आधारित एक चाचणी घेण्यात आली. दुपारच्या जेवणानंतर सर्व अभ्यासींनी शांतपणे आत्मनिरीक्षण केले व संध्याकाळच्या सत्संगापर्यत आध्यात्मिक वातावरणात स्वत:ला व्यग्र ठेवले.

जोधपूर येथील तीन दिवसांच्या कार्यक्रमास सुमारे १९० अभ्यासी व मुले हजर होती. ध्यानकक्षाची सफ़ाई केली गेली व तो उत्तमप्रकारे सजवण्यात आला, प्रेमभराने व भक्तिभावाने भजने गाण्यात आली. साधनेच्या विविध पैलूंवर मुलांनी छोट्या नाटिका सादर केल्या. गरुदेवांच्या भाषणांची चित्रफीत दाखवण्यात आली. सर्व अभ्यासींनी त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांत, स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्यात गुरुदेवांची भूमिका कशी अनुभवली हे सांगून गुरुदेवांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. सर्व अभ्यासी 'भक्ति, श्रद्धा व गुरुदेवांप्रति समर्पण या गोष्टी जीवनातील संकटे व आव्हानांचा सामना करण्याचे सामर्थ्य देतील' हा संदेश घेऊन, ताजेतवाने होऊन परत गेले.


जोधपूर

भिलवरा येथे 'प्रेमातील शिस्त' ही संकल्पना ठेवण्यात आली होती. गुरुदेवांच्या शिकवणींची पत्रके भिंतींवर लावण्यात आली होती. सकाळच्या सत्संगानंतर भजनांचा कार्यक्रम झाला. त्यानंतर एक नाटक व एक चित्रफीत दाखविण्यात आली.

जयपूर येथे साधनेच्या विविध पैलूंवर भाषणे व चर्चा झाली. त्यानंतर मुलांनी सादर केलेल्या मनोरंजनपर कार्यक्रमाने सर्व उपस्थितांच्या ह्रदयाला स्पर्श केला. तीन दिवसांच्या या कार्यक्रमास सुमारे ३०० अभ्यासी व मुले हजर होती.


जयपूर

खंड ४ अंक ५ सप्टेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र



## सेवेचे महत्व

'जरी अशक्य नसले तरी गुरुदेवांवर प्रेम करणे अवघड आहे' असे पूज्य गुरुदेव दि. १० जानेवारी २०१० रोजी मिशनच्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना म्हणाले होते. 'प्रेम हे असे काही आहे की ज्याबाबत आपण फारसे काही जाणत नाही' या बाबूजी महाराजांच्या फार पूर्वीच्या शिकवणूकीचा ते पुनरुच्चार करत होते. केवळ सेवेतूनच प्रेम उत्पन्न होऊ शकते.

### स्वयंसेवकांचे नोंदणीकरण विभाग

एकसारखा व भरपूर असा स्वयंसेवकांचा ओघ स्वयंसेवक नोंदणीकरण स्थळावर दिसत होता. सर्वच विभाग म्हणजे सुरक्षा, स्वयंपाकघर, भोजनकक्ष, उपहारगृह, ध्यानकक्ष, आरोग्य, वाहतूक, स्वच्छता व निगराणी यापैकी कोणत्याही ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता नव्हती. तिरुपूर व जवळपासच्या केंद्रातील अभ्यासी समारंभासाठी आलेल्या अभ्यासींना मदत करण्यासाठी व त्यांचे वास्तव्य आरामदायी करण्यासाठी अविरतपणे काम करत होते.

### समारंभाची पूर्वतयारी

समारंभाच्या २ महिने आधीपासून भारतातील विविध प्रदेशातील उत्साही स्वयंसेवक समारंभाच्या जागेस भेट देत होते व जागेची तयारी करण्याच्या कामात सहभागी होत होते.

- जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केरळ मधील अभ्यासी साफसफाई, जागेवरील अनावश्यक झुडपे काढून टाकणे, गुरुदेवांच्या निवासासमोरील पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या गटाराचे बांधकाम, तसेच बांधकामासाठी लागणाऱ्या विटांची व इतर सामानाची ने-आण इत्यादी कामात सहभागी झाले. त्यांनी स्वयंपाकघरातही मदत केली व स्वच्छतागृहांची देखील साफसफाई केली.
- जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गुजरात मधील स्वयंसेवक या



कामासाठी हजर झाले. वातावरणातील बदल स्पष्टपणे जाणवत होता तसेच स्वयंसेवकांच्यामधे सुद्धा आंतरीक बदल झालेला होता.

- आंध्र प्रदेशातील स्वयंसेवक गुरुपौर्णिमेपूर्वी हजर झाले. सर्वांनी आपापल्या कामाला जुंपून घेतले. यापैकी काही जण तर समारंभाच्या कालावधीत गुरुदेवांचे दर्शन घेण्यासाठी सुद्धा ध्यानकक्षात येऊ शकले नाहीत.
- तामिळनाडू मधील, तिरुवन्नामलाई, वेल्लोर, इरोड आणि तिरुपूर इथल्या स्वयंसेवकांनी ध्यानकक्षातील जमिनीवरील दगडे काढून सतरंज्या अंथरल्या, व्यासपीठाजवळील झुडपांची स्वच्छता केली. तेथे निर्माण झालेली निखालस, शुद्ध शांतता व अध्यात्मिक अवस्था केवळ अविस्मरणीय होती.
- कर्नाटक येथील स्वयंसेवक वाहतूक व्यवस्था सांभाळत होते. त्यासाठी महिनाभर आधीपासून प्रत्येक आठवड्याच्या शेवटी त्यांनी तिरुप्पूरला भेट दिली. समारंभाच्या दरम्यान ते भोजनकक्ष, सुरक्षा, बालकेंद्र, नोंदणीकक्ष, ध्यानकक्ष व इतर ठिकाणी काम करताना दिसत होते.

### कामाचे वातावरण

स्वयंसेवक हे गुरुदेवांच्या हातातील केवळ अवजारे असल्याप्रमाणे होते त्यामुळेच प्रत्येक गोष्ट योग्य त्याप्रकारेच होत होती. साधे जीवन व्यतीत करण्याचा अर्थ स्वयंसेवकांना उमगला. सर्व स्वयंसेवक जरी देशामधील वेगवेगळ्या प्रांतांतून आलेले होते तरी तिथे प्रेमाचा बंध व बंधुत्वाची भावना जाणवत होती. सर्वजण दिवसरात्र काम करत होते तरी त्यांची उर्जा व उत्साह तसूभर ही कमी होत नव्हता.

## सहज सहल- अजमेर, राजस्थान

दि. १० जुलै २०१० रोजी सत्संगानंतर, अजमेर व किसनगढ येथील अभ्यासी पुष्कर येथे सहलीला गेले होते. एका अभ्यासीच्या शेतातील घरात सुमारे ६० अभ्यासींनी तो दिवस व्यतीत केला. सहजमार्गाची 'मुलभूत साधना' यावरच्या संवादी सत्राने या कार्यक्रमाची सुरवात झाली. अभ्यासी बंधू-भगिनींनी साधनेचे त्यांचे अनुभव कथन केले. या चर्चेमुळे सहभागी अभ्यासींच्या बऱ्याचशा शंकांचे निरसन झाले आणि त्यांना अध्यात्मिक जीवनाच्या गहन पैलूंचे आकलन झाले. मुलांनी सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संध्याकाळच्या सत्संगाने या कार्यक्रमाची सांगता झाली.



खंड ४ अंक ५ सप्टेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र



## युवा कार्यक्रम, कोलकाता

दि. १४ व १५ ऑगस्ट २०११ रोजी दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १८ ते ३० वयोगटातील २६ उत्साही युवक सहभागी झाले होते. परस्परांची ओळख करुन घेण्याच्या सत्रानंतर सहभागी अभ्यासींनी भंडाऱ्यातील स्वत:चे अनुभव कथन केले. चर्चेतून असे अनुमान काढण्यात आले की भंडाऱ्यातून आल्यानंतर स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रेरणा मिळते. भंडाऱ्यामधील आनंदमय व ईश्वरीय वातावरण आपल्या दैनंदिन जीवनातदेखील असावे ही अभिलाषा स्व-परिवर्तनासाठी आपल्याला प्रवृत्त करते. या प्रेरणेचे चिरकाळ टिकणाऱ्या बदलात रूपांतर करणे केवळ आपल्याच हातात असते.

सायंकाळच्या सत्संगानंतर सगळ्यांनी बास्केटबॉलच्या खेळामध्ये भाग घेतला आणि दिवसाची सांगता रात्रीच्या जेवणानंतरच्या सिनेमा सत्राने झाली.

दुसऱ्या दिवशी 'श्रेयस' व 'प्रेयस' ह्या मधील द्वंद्वाबद्दल विचार करण्याची प्रेरणा देणारे, कथेवर आधारित शिकवणीचे सत्र आयोजित करण्यात आले होते. मौजमजेच्या गोष्टींकडे आपला ओढा का असतो व ही प्रवृत्ती आपल्याला दीर्घकाळात वेदनादायी कशी ठरते ह्याबद्दल विचार मांडण्यात आले.

'जीवनातील भूमिका' ह्या नावाचे एक सत्र घेण्यात आले. दैनंदिन जीवनामध्ये आपण कोणकोणत्या भूमिका साकारतो व त्या भूमिका वठवताना आपण कसे वागतो हे ह्या सत्रामध्ये परिणामकारकपणे दाखविण्यात आले. या वेळी काही सांघिक लघुनाटिका प्रस्तुत करण्यात आल्या. या कार्यक्रमाने मौज-मजा व हास्यासोबतच एकात्मिक व्यक्तिमत्व आणि जीवनातील प्रत्येक भूमिकेतून जात असताना आध्यात्मिक व नैतिक मूल्यांच्या जोपासनेचे महत्त्व अधोरिखित केले.

आपल्या साधनेमध्ये अनियमितपणा असण्याची कारणे व यावर मात करण्याचे उपाय याबद्दल आत्मपरिक्षण करण्याचे सत्र दिवसाच्या शेवटी ठेवण्यात आले होते.

या संपूर्ण शिबीरामध्ये सहभागींना स्वत:च्या वैयत्तिक साधनेवर लक्ष देण्यास, शिस्त अंगीकारण्यास व या दोन्ही गोष्टी आपल्या दैनंदिन जीवनात अंतर्भूत करण्यास प्रेरीत करण्यात आले.

## युवा शिबीर, गाझियाबाद

गाझियाबाद येथे दि. १० जून २०११ रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका युवा शिबीरात सुमारे ५० अभ्यासी सहभागी झाले होते. अस्तित्वात असलेल्या सदगुरुंची भूमिका व आवश्यकता याबद्दल चर्चा करण्यात आली. आपल्या गुरुपरंपरेबद्दल व मिशनच्या इतिहासाबद्दल माहितीचे सादरीकरण करण्यात आले. दुसऱ्या केंद्रातील युवक कार्यक्रमांबद्दल महिती देण्यात आली. सहज मार्ग साधना योग्य पद्धतीने करण्याबद्दल व खास करून 'शुद्धिकरण' ह्या विषयावर सखोल चर्चा झाली. स्वयंसेवी कार्याचे महत्त्व व ते योग्य प्रकारे कसे करावे ह्या विषयावर एक उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. आश्रमाच्या दैनंदिन व्यवहारात स्वयंसेवकांची आवश्यकता असणाऱ्या क्षेत्रांबद्दलही चर्चा झाली. आश्रमाच्या देखभालीत युवकांच्या भूमिकेची त्यांना जाणीव झाली व त्यांनी स्वयंसेवक म्हणून नियमित काम करण्याची तयारी दाखवली.

## एकोज वार्तापत्राबद्दल सामान्य ज्ञान चाचणी


जामनगर, गुजरात येते एकोज वार्तापत्रावर आधारित एक सामान्य ज्ञानाची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे तीस मिनिटांमध्ये द्यायची होती. सहभाग परिणामकारक व्हावा ह्या हेतूने सहभागींना स्पर्धेपूर्वी २० मिनिटे एकोज वार्तापत्र वाचण्यासाठी देण्यात आले. एकूण २० अभ्यासींनी ह्या स्पर्धेमध्ये भाग घेतला. प्रत्येक योग्य उत्तराला ५ गुण देण्यात आले व प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ५ गुण कमी करण्यात आले. बंधू अनुज व बंधू ए.आर. छत्रीवाला यांना अनुक्रमे पहिले व दुसरे बक्षीस मिळाले. जास्तीजास्त अभ्यासींना एकोज वार्तापत्र नियमितपणे वाचण्यास प्रोत्साहन मिळावे ह्या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तिरुपूर येथील भंडाऱ्यानिमित्त प्रकाशित केलेल्या एकोजच्या विशेष अंकामधील विस्तृत अहवाल वाचून सर्वांनी वार्तापत्राचे कौतुक केले.



खंड ४ अंक ५ सप्टेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# प्रकाशाचे केंद्र

## तिनसुकिया आश्रम, आसाम





### प्रारंभ

तिनसुकिया आश्रम जरी छोटा असला तरी हा देशातील तिसऱ्या क्रमांकावर असलेला सर्वात जुना आश्रम आहे. हा आश्रम गुवाहाटी पासून ४८० कि.मी. दूर असून दिब्रूगढ विमानतळापासून एका तासाच्या अंतरावर आहे. तिनसुकिया ही आसामची व्यवसायिक राजधानी आहे व तेथे आसामी, बंगाली व हिंदी भषिकांची मिश्र लोकवस्ती आहे.

स्वर्गवासी बंधू काशीराम अग्रवाल हे तिनसुकिया येतील पहिले अभ्यासी होते व ते मिशनचे संयुक्त सचिव होते. जसजशी अभ्यासींची संख्या वाढली तसे ह्या केंद्रातील अभ्यासींनी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सभोवताली ४००० चौ. फूटाची मोकळी जागा असलेले एक ३५०० चौ. फूटाचे जुने गोदाम विकत घेत्ले. हा आश्रम मध्यवर्ती बस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असून रेल्वे स्थानकापासून ३ कि.मी अंतरावर आहे.

### पूज्य बाबूजी महाराजांचे प्रारंभीचे कार्य

१९६१ साली बाबूजी महाराजांनी तिनसुकिया केंद्राला भेंट दिली. भारताच्या ह्या ईशान्य भागात पोहोचण्यासाठी बाबूजी त्या काळात रेल्वेने प्रवास करीत व बोटीने ब्रम्हपुत्र नदी पार करीत. १९६१ साला नंतर बाबूजींनी तिनसुकियाला १९६५, १९६८, १९६९, १९७०, १९७१, १९७३, १९७५ व १९७७ मध्येही भेट दिली.

दि. २५ नोव्हेंबर १९७७ रोजी भारतातील सर्व भागांमधून आलेल्या अभ्यासींच्या उपस्थितीत बाबूजींनी ह्या आश्रमाचे उद्घाटन केले. त्या प्रसंगी ते म्हणाले,'सहजमार्गामध्ये प्राणाहुतीचा अंतर्भाव असल्यामुळे तिचा सुगंध दरवळतो हे जरी खरे असले तरी प्रेम आणि भक्ति ह्या दोन अत्यंत महत्वाच्या गोष्टी दुर्लक्षितच राहतात. ध्यानाला ह्या दोन गोष्टींचे साहचर्य असणे अत्यंत आवश्यक असते. या तीनही पैलूंची सरमिसळ करण्याच्या आवश्यकतेवर मी भर देतो कारण हे केल्यामुळे साधकाची ध्येयाप्रतिची वाटचाल शीघ्रतेने होते.'

चारीजी महाराजांनी ह्या केंद्राला १९८५, १९८६ व २००२ साली भेट दिली. त्यांच्या २००२ च्या तिनसुकिया व दिगबोईच्या भेटीच्या वेळी भारतातील व परदेशातील सुमारे ७०० अभ्यासी ह्या केंद्रात उपस्थित राहिले होते. आसाम व ईशान्य भागातून आलेल्या २०० अभ्यासींच्या उपस्थितीत दि.२५ नाव्हेंबर २००२ रोजी तिनसुकिया आश्रमाचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला.

### नूतनीकरण

आधी हा आश्रम एका मजल्याची आर सी सी इमारत होती ज्या मध्ये केवळ गुरुदेवांची खोली, स्वयंपाक घर व भोजन कक्ष होते. सभोवती बरीचशी हिरवळ व एक सुंदर असा बगीचा होता. गुरुदेवांच्या परवानगीने वर आणखी एक मजला बांधण्यात आला आणि आश्रमाचे नूतनीकरण करण्यात आले. स्वयंसेवकांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे व अभ्यासींच्या सहाय्यामुळेच हे काम अठरा महिन्यात पूर्ण होण्यास मदत झाली.







खंड ४ अंक ५ सप्टेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

या प्रयासांचा परिपाक म्हणजे ३६०० चौ. फूटांचा, मधे एकही खांब नसणारा आणि छान हवेशीर असा ध्यान–कक्ष तयार झाला. पूज्य गुरुदेवांच्या परवानगीने या नवीन सुविधेचा वापर फेब्रुवारी २०११ पासून सुरू झाला.

## कार्यक्रम

सध्या सुमारे १२५ अभ्यासी रविवारच्या सत्संगाकरिता उपस्थित असतात. या केंद्राचे युवकांसाठीचे कार्यक्रमही मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहेत. केवळ तिनसुकिया केंद्रच नाही तर आस–पासच्या उपकेंद्रांकडून अभ्यासी–प्रशिक्षण कार्यक्रम, सहज मार्ग पचियाचे खुले सत्र इत्यादि करिता आश्रमाचा उपयोग केला जातो. आश्रमामध्ये अभ्यासी ओळख–पत्रे बनवणे, साहित्य–वितरण तसेच ईशान्य भागाच्या केंद्रांसाठी अभ्यासींचे उपस्थिती–पत्रक तयार करणे ही कामे सुद्धा केली जातात.

या केंद्रामुळे भारताच्या ईशान्य भागात मिशनच्या वाढीला चालना मिळाली असून याच्या परिसरात दिग्बोई, डोंडूमा, नहरकटीया, दिब्रुगढ, सिबसागर, जोरहट, नाझिरा, दुलियाजन, जगुन व उत्तर लखिमपूर अशी उप–केंद्रे उदयास आली आहेत. जरी लहान असला तरी तिनसुकिया आश्रम ईशान्य भारतामध्ये मिशनच्या प्रगतीचा मैलाचा दगड ही भूमिका पार पाडत आहे.








## प्रशिक्षकांचा प्रवासी कार्यक्रम– दक्षिण कर्नाटक





दि. २५ व २६ जून या दिवशी दक्षिण कर्नाटक येथील सर्व केंद्रांच्या प्रशिक्षकांसाठी एका प्रवासी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व केंद्रांत एकाच वेळी वैयक्तिक सिटींग, रविवारचा सत्संग, पारिवारिक एकत्रीकरणे, रविवारचा संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम इत्यादि योजले होते.

३२ केंद्रांमध्ये ५८ प्रशिक्षक व स्वयंसेवकांच्या मदतीने हा कार्यक्रम संपन्न झाला. दि. २५ जून रोजी एकूण ३० पारिवारिक एकत्रीकरणाचे कार्यक्रम झाले. साधनेच्या विविध पैलूंबाबत विस्ताराने चर्चा झाली व ते समजावून सांगण्यात आले. यामुळे अनेक नवागतांनी साधनेची सुरुवात करण्यास उत्सुकता दाखवली.

दि. २६ जूनच्या कार्यक्रमाची सुरुवात 'भंडाऱ्यासाठी तयारी कशी करावी?' या विषयावरील वार्तालापाने झाली. यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. 'पिक ॲन्ड टॉक' सत्रामध्ये अभ्यासींचा दांडगा उत्साह दिसून आला.

या कार्यक्रमाचे उपस्थितांनी प्रशंसापूर्वक स्वागत केले. प्रशिक्षकांबरोबर शंकानिरसनाची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला.

अभ्यासी स्वयंसेवकांची निष्ठा व कामाप्रति वाहून घेण्याची वृत्ति या मुळे का कार्यक्रम यशस्वी झाला.

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**
© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.